## पोलीस उपनिरीक्षक परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील पोलीस उपनिरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

**१.२ पदांचा तपशील :-**

**१.२.१ संवर्ग :-** अराजपत्रित, गट - ब.

**१.२.२ नियुक्तीचे ठिकाण :-** राज्य शासनाच्या पोलीस दलाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात.

**१.२.३ वेतनबँड व ग्रेड वेतन :** - रुपये ९३००-३४८००,४३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**१.२.४ उच्च पदावर बढतीची संधी :-** ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक पोलीस निरीक्षक व त्यावरील पदे.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण चार टप्प्यात घेण्यात येते :-

(१) पूर्व परीक्षा - १०० गुण. (२) मुख्य परीक्षा - २०० गुण. (३) शारीरिक चाचणी - १०० गुण (४) मुलाखत - ४० गुण

**२.२** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते. या करीता पूरव परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येईल.

**२.३** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**२.४** मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतात. शारीरिक चाचणीमध्ये किमान ५० गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

**२.५** जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३. अर्हता :-**

**३.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

**३.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.३** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.४** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.५ शारीरिक पात्रता :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**३.६** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची शारिरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**४. शुल्क (फी) :-**

**४.१** प्रस्तुत भरतींकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | पूर्व परीक्षा | ३६५ | २६५ |
| (२) | मुख्य परीक्षा | ५१५ | ३१५ |

४.२ वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर)उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

४.४ दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करुन भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

## ५. पूर्व परीक्षा :-

### ५.१ परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिका :- एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| विषय व संकेतांक | प्रश्नसंख्या | एकुण गुण | दर्जा | परीक्षेचे माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक क्र.०१२) | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ |

**५.२ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**५.३ परीक्षा केंद्र : -**

**५.१** खालील ठिकाणी सदर पूर्व परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| हिंगोली | २३ |
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| उस्मानाबाद | ३६ |
| परभणी | ३७ |
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशीम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |
| पालघर | ४७ |

**५.२** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**५.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

### ५.४ पूर्व परीक्षेचा निकाल :-

**५.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.४.२** भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.४.३** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.४.४** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.४.५** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.४.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.४.७** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

## ६. मुख्य परीक्षा : -

**६.१ परीक्षेचे टप्पे :-** (**१**) लेखी परीक्षा-२०० गुण (**२**) शारीरिक चाचणी - १०० गुण (**३** ) मुलाखत- ४० गुण

**६.२ परीक्षेस प्रवेश :-**

**६.२.१** पूर्व परीक्षेकरीता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षाशुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.२.३** प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.३ परीक्षा योजना :-**

**६.३.१ प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :-** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी.

**६.३.२ एकूण गुण :-** २००

**६.३.३ प्रश्नपत्रिकांची संख्या :-** दोन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १<br>(संकेतांक ००२) | मराठी व | ६० | ६० | मराठी - बारावी | मराठी | एक तास |
| | इंग्रजी | ४० | ४० | इंग्रजी - पदवी | इंग्रजी | |
| २<br>(संकेतांक ०२५) | सामान्य ज्ञान, बुध्दिमापन व विषयाचे ज्ञान | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास |

**६.३.४ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**६.४ परीक्षा केंद्र :-**

**६.४.१** खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | १५ |
| मुंबई | ३० |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | ३२ |
| पुणे | ३८ |

**६.४.२** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.४.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.४.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.४.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**६.४.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.५ लेखी परीक्षेचा निकाल :-**

**६.५.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.५.२** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील,अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**६.५.३** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी मुख्य परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पात्र समजण्यात येईल.

**६.५.४** प्रस्तुत लेखी परीक्षेमधून शारीरिक चाचणीसाठी पात्र होण्याकरिता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील :-

**(१) अमागास- किमान ३५ शतमत**

**(२) मागासवर्गीय -किमान ३० शतमत**

**(३) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू – किमान २० शतमत**

**६.५.५** लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, शारीरिक चाचणी आणि मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**६.५.६** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच अपंग, महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७. शारीरिक चाचणी : - एकूण १०० गुण.**

**७.१** मुख्य परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतील. अशा उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी आयोगाने विहित केलेल्या दिनांकास व ठिकाणी उमेदवाराला स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**७.२** उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणा-या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

**७.३ शारीरिक चाचणीचा तपशील :-**

| पुरुषांसाठी | महिलांसाठी |
|---|---|
| (१) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - १५ | (१) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २० |
| (२) पुल अप्स - कमाल गुण - २० | (२) धावणे ( २०० मीटर्स ) - कमाल गुण - ४० |
| (३) लांब उडी - कमाल गुण - १५ | (३) चालणे (३ कि.मी.) - कमाल गुण - ४० |
| (४) धावणे (८०० मीटर्स ) - कमाल गुण - ५० | |

७.४ शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणा-या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

७.५ आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल.

७.६ फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणा-या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणा-या उमेदवारांची मुलाखत त्याच दिवशी अथवा स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

७.७ शारीरिक चाचणीच्या सरावासाठी उमेदवार राज्यातील पोलीस कवायत मैदानांचा उपयोग करू शकतील आणि पोलीस मुख्यालयातील पोलीस उपायुक्तांच्या, तसेच पोलीस अधिक्षकांच्या परवानगीने निदेशकांची मदत घेऊ शकतील.

७.८ शारीरिक चाचणीमध्ये किमान ५० गुण मिळविणा-या उमेदवारांची मुलाखत आयोगाने निर्धारित केलेल्या दिनांकास व ठिकाणी घेण्यात येईल. त्याकरिता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**८. मुलाखत :-**

८.१ शारीरीक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखत **४०** गुणांची असेल.

८.२ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

८.३ विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

८.४ मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**९. अंतिम निकाल :-**

मुख्य परीक्षा, शारिरिक चाचणी आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमध्ये समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) `` **उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**`` मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**१०. शिफारस :-**

(१)"**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

(२) मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते, ईमेलद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील.

************